# सोलापूर महानगरपालिक सार्वत्रिक निवडणुक २०१७

## -: प्रेस नोट :-

सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुक २०१७ चा कार्यक्रम घोषीत झाला असून आचारसंहिता लागू झालेली आहे. निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी कशा प्रकारे करावयाचे आहे याबाबत राज्य निवडणूक आयोगाने निर्देश दिलेली आहे. त्यामध्ये महानगरपालिका क्षेत्रात मतदारावर विपरीत प्रभाव टाकणारे कोणतीही कृती / घोषणा स्थानिक स्वराज्य संस्था पदाधिकारी  किंवा अन्य कोणत्याही पदाधिका-यांना करता येणार नाही. निवडणुकीचा कार्यक्रम घोषीत झाल्यापासून आचारसंहिता लागू झाली असून, ती निवडणुकीचा निकाल जाहिर होईपर्यंत अंमलात राहणार आहे. आचारसंहितेच्या अंमलबजावणी बाबत आयोगाचे दि १४/१०/२०१६ चे पत्रातील तरतुदींचे पालन होईल याची दक्षता घ्यावयाची आहे.

त्याचप्रमाणे निवडणुक लढविणा-या उमेदवारांनी विहित पध्दतीने व वेळेत खर्चाचे हिशोब सादर करावयाचे आहे. हिशोब सादर न करणा-या उमेदवारांना अपात्र ठरविण्याची तरतुद आहे. यामुळे निवडणुक लढविणा-या उमेदवारांनी त्यांचा खर्चाचा हिशोब तसेच निवडणुकीचा निकाल जाहिर झाल्यापासून ३० दिवसाच्या आत एकत्रित खर्चाचा तपशील महानगरपालिका आयुक्त किंवा ते प्राधिकृत करतील अशा अधिका-याकडे दयावयाचा आहे.

वरील प्रमाणे आचारसंहिता व खर्चाचा हिशोब सादर करणे या दोन्ही बाबीसाठी राज्य निवडणुक आयोगाकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या आदेश व निर्देश यानुसार कार्यवाही ठेवणेकामी राजकीय पक्षांना अवगत करण्यासाठी दि. १३/०१/२०१७ रोजी दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉल येथे बैठक आयोजीत करण्यात आली आहे. या बैठकीत मा.आयुक्त , सोलापूर महानगरपालिका व मा. पोलीस आयुक्त सोलापूर शहर हे मार्गदर्शन करणार आहेत. यासाठी सर्व राजकीय पक्षांनी या बैठकीस उपस्थित राहून निवडणुक कालवधीतील आचारसंहिता , उमेदवारांच्या खर्चाचा हिशोब वगैरी कामकाजाची माहिती घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.